# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयांमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल विज्ञान उद्योजकता महाविद्यालयांमध्ये दिनांक 12 जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. सुरुवातीला राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी कु.अमृता माने व कु. राजनंदिनी गायकवाड यांनी जिजाऊ वंदना सादर केली. त्यानंतर महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. सुमित्रा चव्हाण हिने कार्यक्रमाचे प्रस्तावित केले. यावेळी बऱ्याच विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर महाविद्यालयातील प्रा गौतम जाधव व प्रा स्नेहा हगरगुंडगी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. किरण जगताप उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची आज समाजाला गरज असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांनी प्रत्येक कृतीमध्ये दूरदृष्टी अवलंबने गरजेचे असल्याचे मत त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.प्राची खोत हिने केले तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या विद्यार्थी कु. शंतनू देवकर याने केले. या कार्यक्रमासाठी प्रा अंकुश गोरट्याल, प्रा समाधान कदम, प्रा विनय समलेटी, प्रा भारती जाधव, प्रा कविता संभारम, प्रा स्नेहल मठे, प्रा शितल भोजणे, प्रा अमृता जगताप, क्रीडा शिक्षक प्रा गोकुळ यादव आदी शिक्षक - शिक्षकेतर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




वडाळा
दि.- 12/01/2023


स्वामी विवेकानंद जयंती
वडाळा
राजमाता जिजाऊ जयंती


/2023